नियमित दिवाणी दावा क. ९५/२०१५ मध्ये निशाणी क्र. १११ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी, प्रतिवादी क्र.१ चे नाव दाव्याच्या सरनाम्यातून कमी (delete) करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ हे, दि. १३.०६.२०२५ रोजी, मयत झाले आहेत. त्यांचे वारस प्रतिवादी क्र. २ ते ५ हे, यापूर्वीच दाव्यामध्ये सामील आहेत, त्यामुळे त्यांना पुन्हा वारस म्हणून अभिलेखावर आणण्याची आवश्यकता नाही. तरी, दाव्याच्या सरनाम्यातून प्रतिवादी क्र.१ चे नाव कमी (delete) करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी, त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांचा मयत दाखला सोबत दाखल केला नाही. तरी, अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज व प्रतिवादी यांचे म्हणणे, यांचे अवलोकन केले. सदर दावा हा वाटप होऊन पृथक कब्जा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. दाव्याच्या सरनाम्यातून, प्रतिवादी क्र.१ चे नाव कमी केल्यास, इतर प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होणार नाही, याशिवाय दाव्याच्या स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही व उभय पक्षातील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करणे सोयीचे होईल. अशा परिस्थितीत, दाव्यातील गुंतागुंत टाळण्याकरीता, दाव्यातील खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्याकरीता, तसेच दावा गुणदोषावर निकाली करण्याकरीता, अर्ज मंजुर करणे न्यायोचित्त होईल. सबब, खालील आदेश पारीत करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल.

आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जात मागितल्याप्रमाणे दुरुस्ती करुन, दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

PATIL VRUSHALI KISANRAO

Digitally signed by PATIL VRUSHALI KISANRAO Date: 2025.09.29 17:14:39 +0530

(व्ही.के. पाटील)

दिनांक : २९/०९/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा.

# **CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order are same word to word as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : S.M. Gaddam |
| (b) | Court | : Civil Judge Jr. Div., Mangalwedha. |
| (c) | Date of Order | : 29-09-2025 |
| (d) | Order uploaded on | : 29-09-2025 |